# पोलीस स्टेशन MIDC दसरखेड

पोलीस स्टेशन MIDC दसरखेड हद्दीतील ग्राम दसरखेड नवीन कायदे बाबत जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यात आली. नवीन कायदे भारतीय न्याय संहिता- 2023, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता- 2023 आणि भारतीय साक्ष अधिनियम, 2023 तसेच I.T. Act, सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर व महिला संबंधी घडणारे अपराधासंबंधाने घ्यावयाची दक्षता, महिला विद्यार्थी सुरक्षा, सायबर fraud, बँकिंग fraud, डायल 112, वाहतूक नियम पालन, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले तसेच पोक्सो कायद्याअंतर्गत माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.

सध्या समाजामध्ये सोशल मीडिया व इतर प्रसार माध्यमांद्वारे सुरू असलेल्या अराजकतेबाबत सतर्क राहून आपणाकडून कायद्याचे कुठलेही उल्लंघन होणार नाही व अशा घटनांपासून स्वतःचा बचाव कसा करावा पोलिसांची व विधी सल्लागार यांची मदत कशी घ्यावी तसेच कायदेशीर मार्गदर्शन कसे प्राप्त करावे याबाबत सहाय्यक सरकारी अभियोक्ता Malkapur श्री दिनेश वाकोडे, श्री कृष्णा गार मोडे व सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमराज कोळी यांनी मार्गदर्शन केले.





स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०